महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम

७ गावांमध्ये राजकीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी उपक्रम घेणे: गुण ५

- विविध कार्यकारी सोसायटी, ग्रामपंचायत व पतपेढ्या यांच्या निवडणुका बिनविरोधी करण्याचा प्रयत्न करणे.
- पोलीस बंदोबस्ताशिवाय निवडणुका शांततेत पार पाडणे.

८ गावातील अनिष्ट प्रथा रोखणे : गुण ५

- अनिष्ट प्रथा, चालीरीती रोखण्यासाठी प्रयत्न करणे.
- प्रबोधनात्मक कार्यक्रम घेणे.

९ वैयक्तिक समारंभ/कार्यक्रम उत्सव : गुण ५

- ध्वनिक्षेपकाचा नियमानुसार व मार्यादित वापर.
- वरातीमधील गैरप्रकारांना प्रतिबंध करणे.

१० नावीन्यपूर्ण उपक्रम : गुण ५

- गावातील स्त्री-पुरूष प्रमाण (जन्मदर) सुधारणे.
- बाल कामगार व बाल गुन्हेगारी रोखून त्यांच्या पुनर्वसनाचा प्रयत्न करणे.
- विधवा, परित्यक्ता व निराधार महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्न करणे.
- रस्ता सुरक्षेबद्दल उपाययोजना व प्रबोधन करणे.
- वन संवर्धन व वन संरक्षण याबाबत उपाययोजना करणे.
- गावात समितीला राबवावेत असे वाटणारे इतर उपक्रम.

### मूल्यमापन

मोहिमेमध्ये भाग घेतलेल्या गावांचे मूल्यमापन करण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय कार्यकारी समिती प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्र जिल्हा मूल्यमापन समित्या स्थापन करील.

जिल्हा मूल्यमापन समिती पाच सदस्यांची असेल आणि त्यामध्ये महसूल अधिकारी, पोलीस अधिकारी, विधी अधिकारी/विधी सल्लागार, एका पंचायत समितीचे सभापती व जिल्हा पत्रकार संघाने शिफारस केलेल्या एका प्रतिनिधीचा समावेश असेल. महसूल अधिकारी समितीचे अध्यक्ष राहतील.

राज्य स्तरावरून बाह्य मूल्यमापनासाठी एका जिल्ह्यातील मूल्यमापन समित्या दुसऱ्या जिल्ह्यात पाठविण्यात येतील.

जिल्हास्तरीय कार्यकारी समिती त्यांना बाह्य मूल्यमापनासाठी दिलेल्या जिल्ह्यांचे मूल्यमापन त्यांच्या जिल्ह्याच्या मूल्यमापन समित्यांमार्फत करून घेऊन अहवाल शासनास पाठवील. बाह्य मूल्यमापनात पात्र ठरलेल्या गावांना शासन तंटामुक्त गाव म्हणून घोषित करील.

| तंटे निवारण | प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे | दाखल तंटे मिटविणे (३० सप्टें. पर्यंतचे) | नव्याने निर्माण होणारे तंटे मिटविणे (३० सप्टें. ते ३० एप्रिल) |
|---|---|---|---|
| एकूण गुण २०० | ८० | १०० | २० |
| किमान आवश्यक गुण | ५६ | ७० | १४ |

तंटामुक्त गाव जाहीर करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, दाखल तंटे मिटविणे व नव्याने निर्माण होणारे तंटे मिटविणे यासाठी अनुक्रमे ५६, ७० व १४ किमान गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. मात्र तंटामुक्त गाव या पात्रतेसाठी एकत्रित १५० गुण मिळविणे आवश्यक राहील. एखाद्या गावात दाखल तंटेच नसतील किंवा नव्याने तंटे निर्माण झालेच नाहीत तर त्या त्या तंट्यांच्या प्रकारातले किमान गुण त्यांना दिले जातील.

### पुरस्कार

तंटामुक्त झालेल्या प्रत्येक गावास लोकसंख्येच्या आधारावर पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे रोख पुरस्कार आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

| तंटामुक्त गावाची लोकसंख्या | पुरस्काराची रक्कम |
|---|---|
| १००० पर्यंत | रुपये १,००,०००/- |
| १००१ ते २००० पर्यंत | रुपये २,००,०००/- |
| २००१ ते ३००० पर्यंत | रुपये ३,००,०००/- |
| ३००१ ते ४००० पर्यंत | रुपये ४,००,०००/- |
| ४००१ ते ५००० पर्यंत | रुपये ५,००,०००/- |
| ५००१ ते १०००० पर्यंत | रुपये ७,००,०००/- |
| १०००० अथवा त्याहून अधिक | रुपये १०,००,०००/- |

१९० पेक्षा अधिक गुण मिळविण्याऱ्या गावांना त्यांना मिळणाऱ्या पुरस्कारासह मिळालेल्या पुरस्कार रकमेच्या २५% इतकी अधिकची रक्कम विशिष्ट सन्मानचिन्हांसह **''शांतता पुरस्कार''** म्हणून देण्यात येईल.

एकदा पुरस्कार प्राप्त केलेल्या गावांना पुन्हा पुरस्कार देण्यात येणार नाही. तथापि, अशा गावांनी पुढील वर्षांमध्ये तंटे मिटविण्यामध्ये सातत्य राखल्यास **''विशेष पुरस्कार''** देण्याबाबत राज्यस्तरीय समिती विचार करेल.

### पुरस्कार रकमेचा विनियोग

तंटामुक्त गाव पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायती ग्रामसभेच्या मान्यतेने पुरस्काराची रक्कम केवळ स्थायी स्वरूपी कामे उभारण्याबाबतच्या विकास कामासाठी खर्च करतील. याबाबत मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

### प्रसिद्धीसाठी पुरस्कार

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम प्रभावी व यशस्वीरित्या राबविण्यामध्ये पूरक व प्रबोधनात्मक बातम्यांच्या माध्यमातून मोहिमेतील कामांना वस्तुनिष्ठ प्रसिद्धी देणाऱ्या वृत्तपत्रांच्या बातमीदारांना जिल्हास्तर, विभागीयस्तर व राज्यस्तरावर प्रत्येकी तीन पुरस्कार देण्यात येतील.

| | | |
|---|---|---|
| जिल्हास्तर | अ) प्रथम पुरस्कार | रु. २५,०००/- |
| | ब) द्वितीय पुरस्कार | रु. १५,०००/- |
| | क) तृतीय पुरस्कार | रु. २५,०००/- |
| विभागीय स्तर | अ) प्रथम पुरस्कार | रु. १,००,०००/- |
| | ब) द्वितीय पुरस्कार | रु. ७५,०००/- |
| | क) तृतीय पुरस्कार | रु. ५०,०००/- |
| राज्य स्तर | अ) प्रथम पुरस्कार | रु. २,५०,०००/- |
| | ब) द्वितीय पुरस्कार | रु. १,५०,०००/- |
| | क) तृतीय पुरस्कार | रु. १,००,०००/- |

सदर पुरस्कार योजनेसंबंधी शासन स्वतंत्रपणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करील.

### आवाहन

**गावांसाठी आणि गावकऱ्यांसाठी ही तंटामुक्त गाव मोहीम आहे.**

**गावकऱ्यांनो आपल्यासाठी ही सुवर्णसंधी आहे. आपले तंटे/भांडणे/वाद/दावे या मोहिमेच्या माध्यमातून मिटवून घ्या व कटकटीतून आणि चिंतेतून मुक्त व्हा.**

**गावातील भांडणे आणि वाद गावाच्या विकासाच्या वाटचालीत सर्वात मोठे अडथळे आहेत. आपलं गाव तंटामुक्त करा आणि गावाच्या विकासाचा मार्ग सोपा आणि सुकर करा...**

शांततेतून समृद्धीकडे...

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन


### 'महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम' उद्दिष्ट्ये

- गाव पातळीवर तंटे निर्माण होऊ नयेत म्हणून प्रतिबंधात्मक कार्यक्रम राबविणे.
- दाखल असलेले व नव्याने निर्माण होणारे तंटे तडजोडीने मिटविण्याचा प्रयत्न करणे.
- गावासाठी गावातच लोकसहभागातून तात्काळ व सर्वमान्य तडजोड घडवून आणण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे.
- गावातील जनतेमध्ये जातीय व धार्मिक सलोखा, सामाजिक व राजकीय सामंजस्य आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करणे.
- पोलिसांच्या कामामध्ये पारदर्शकता आणून त्यांची जनमानसातील प्रतिमा सुधारून 'जनतेचे सेवक' अशी प्रतिष्ठा प्राप्त करणे.
- लोकांच्या सहकार्याने अवैध धंद्यांना प्रतिबंध करणे व त्यांचे निर्मूलन करणे.
- भ्रष्टाचार व भ्रष्टाचारी प्रवृत्ती कमी करण्यासाठी गावपातळीवर प्रयत्न करणे.
- अनिष्ट प्रथा व चाली-रीती नष्ट करण्यासाठी लोकामध्ये जागृती निर्माण करणे.

शांततेतून समृद्धीकडे...

महात्मा गांधी तंटामुक्त गाव

# महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम



महाराष्ट्रासारखे भारतातील एक पुरोगामी आणि प्रगत राज्य आता 'महात्मा गांधी तंटामुक्त गाव' मोहीम हाती घेत आहे. कुठल्याही तंट्याचं मूळ क्षुल्लक असतं पण परिणाम गंभीर असतात. छोट्या कारणाने होणाऱ्या अशा तंट्याचे रुपांतर मोठ्या गुन्ह्यात होऊन गावाच्या शांततेचा भंग होतो. गावागावातील तंटे मिटवणे आणि टाळणे हेच या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. प्रत्येक गाव तंटामुक्त होण्यासाठी गावातील सर्व लोकांचे सहकार्य आवश्यक आहे. जातीय आणि धार्मिक सलोखा, तसेच राजकीय आणि सामाजिक सामंजस्य राखण्यासाठी ही मोहीम यशस्वी करण्याचा सर्व मिळून प्रयत्न करूया.

### मोहिमेचे स्वरूप व मोहीम केंद्रीत तंटे

गावात तंटे निर्माण होऊच नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, अस्तित्वातील व नव्याने निर्माण होणारे तंटे सामोपचाराने मिटविणे हे मोहिमेचे स्वरूप आहे. 'महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमे' अंतर्गत पुढील तंटे मिटवता येतील.

(अ) **दिवाणी** – स्थावर मालमत्तेचे मालकी हक्क, वारसा हक्क, वाटप, हस्तांतरण, इत्यादी तसेच भाडेपट्टा, जंगम मालमत्तेची खरेदी–विक्री, हस्तांतरण, गहाण व कर्ज व्यवहार, रकमांची देवाणघेवाण, पोटगी, इत्यादी व इतर कारणांवरून निर्माण झालेले सर्व दिवाणी वाद/तंटे.

(ब) **महसुली** – शेतीचे मालकी हक्क, वारसा हक्क, हद्दी, अतिक्रमणे, वाटप त्याचप्रमाणे गांवठाणातील जागा, गोठे, परडे यांचे मालकी हक्क, हद्दी आणि खुणा यांवरून निर्माण झालेले तंटे. कुळ कायदा, वतन कायदा, जमीनविषयक इतर विविध कायदे, सार्वजनिक रस्ता व शेतात जावयाचा रस्ता इत्यादी व इतर कारणांवरून निर्माण झालेले सर्व तंटे.

(क) **फौजदारी** – शारीरिक, मालमत्ता आणि फसवणूक यासंबंधीचे अदखलपात्र व दखलपात्र फौजदारी गुन्ह्यांपैकी जे गुन्हे संबंधित पक्षकारांच्या सहमतीने व कायद्यानुसार मिटविता येऊ शकतात असे.

(ड) **इतर तंटे** – दिवाणी, महसुली, फौजदारी तंट्यांव्यतिरिक्त सहकार, कामगार, औद्योगिक क्षेत्रातील व इतर तंटे.

जे फौजदारी तंटे कायद्यातील तरतुदीनुसार मिटविता येऊ शकणार नाहीत अशा तंट्यांबाबत संबंधित पोलीस ठाणे अथवा संबंधित न्यायालयामध्ये योग्य ती कार्यवाही होत राहील.

### ग्रामपंचायत हेच एक गाव

सदर मोहीम राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये सातत्याने राबविण्यात येईल. ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सर्व गावे, वाड्या, वस्त्या यांचा त्यात समावेश राहील. संपूर्ण ग्रामपंचायत हेच 'गाव' मानले जाईल.

'महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमे'च्या अंमलबजावणीसाठी राज्य, जिल्हा, तालुका, पोलीस ठाणे व गाव पातळीवर समित्या स्थापन करण्यात येतील. प्रत्येक ग्रामपंचायतीस 'तंटामुक्त गाव समिती' स्थापन करणे बंधनकारक आहे.

### समितीचे सदस्य निवडीचे निकष

समाजात ज्यांचा प्रभाव आहे अशा गावातील प्रतिष्ठित, प्रामाणिक, समजुतदार, सामाजिक प्रश्नांची जाण असलेल्या निःस्पृह, निःस्वार्थी व्यक्तींचा समितीमध्ये समावेश असेल. समितीचे सदस्य निर्व्यसनी व उत्तम चारित्र्याचे असावेत.

समितीमध्ये गुंड प्रवृत्तीच्या, कडव्या जातीय विचारसरणीच्या, अवैध धंदे असणाऱ्या वा त्यांचा पुरस्कार करण्याऱ्या तसेच असामाजिक तत्त्वांचा अवलंब करणाऱ्या व्यक्तींना स्थान असणार नाही.

### निमंत्रक

पोलीस पाटील हे सदर समितीचे निमंत्रक असतील. ज्या गावामध्ये पोलीस पाटील हे पद रिक्त असेल अशा ठिकाणी तलाठी समितीचे निमंत्रक म्हणून काम पाहतील. ज्या ठिकाणी पोलीस पाटील व तलाठी ही दोन्ही पदे रिक्त असतील अशा ठिकाणी ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी हे समितीचे निमंत्रक म्हणून काम पाहतील.

### मोहिमेचा कार्यक्रम

- दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी तंटामुक्त गाव मोहिमेचा शुभारंभ होईल.
- दिनांक १५ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या कालावधीत ग्रामसभा आयोजित करून ग्रामपंचायतीने मोहिमेत सहभागी होण्याचा निर्णय घ्यावा आणि तंटामुक्त ग्राम समितीची निवड करावी.
- दिनांक ३० सप्टेंबर पूर्वी गावातील सर्व दाखल तंट्यांची यादी करून ती नोंदवहीत नोंदविण्यात यावी.
- दिनांक ३१ मार्च पर्यंत गावातील नोंदवहीत नोंदविलेले व नवीन निर्माण झालेले तंटे मिटविण्याचे प्रयत्न तंटामुक्त गाव समितीने करावेत.
- नवीन निर्माण झालेले तंटे वेळोवेळी मिटवून व गाव तंटामुक्त करण्याचे निकष पूर्ण करून दिनांक १ मे रोजी ग्रामसभेत गाव तंटामुक्त झाल्याचे घोषीत करावे.
- गाव तंटामुक्त झाल्याचा अहवाल तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष व निमंत्रक त्यांच्या स्वाक्षरीने पोलीस ठाणे प्रमुख व तहसीलदार यांच्याकडे पाठवतील.
- पोलीस ठाण्याचे प्रमुख व तहसीलदार यांच्या संयुक्त स्वाक्षरीने तहसीलदार तंटामुक्त गावांची यादी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना तसेच त्याची प्रत उप विभागीय दंडाधिकारी व उप विभागीय पोलीस अधिकारी यांना पाठवतील.
- जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक हे संयुक्त स्वाक्षरीने जिल्ह्यातील तंटामुक्त गावांची यादी शासन (गृहविभाग), पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, विभागीय आयुक्त आणि विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्र) यांना पाठवतील.
- जिल्हास्तरीय कार्यकारी समिती ५ जून पूर्वी अंर्तगत मुल्यमापन करील. जिल्हाबाह्य मूल्यमापनासाठी त्यांना दिलेल्या जिल्ह्यामधील गावांचे जिल्हाबाह्य मूल्यमापन त्यांच्या समित्यांमार्फत करून घेऊन त्या जिल्ह्यातील पुरस्कारपात्र गावांची माहिती दिनांक ३१ जुलै अखेर राज्य शासनास सादर करतील.
- १ ऑगस्ट रोजी राज्य शासन, राज्यातील तंटामुक्त झालेल्या गावांची यादी जाहीर करेल.
- ९ ऑगस्ट रोजी पर्यंत राज्यस्तरीय समारंभ मुंबईत आयोजित करून मा. मुख्यमंत्री / मा. उपमुख्यमंत्री / मा. मंत्री यांच्या हस्ते गावांना पुरस्कार व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

### मोहिमेचे भाग

**१) तंटे मिटविणे** — एकूण गुण १२०

**अ) दाखल असलेले तंटे मिटविणे** — एकूण गुण १००

**तंट्यांची माहिती संकलीत करणे:**

गावांमध्ये दाखल असलेल्या दिवाणी, महसूली, फौजदारी व इतर तंट्याची माहिती तंटामुक्त गाव समितीने संकलीत करावी.

**संकलीत केलेल्या माहितीतील तंट्यांचे वर्गीकरण करणे:**

संकलीत तंट्यांचे वर्गीकरण दिवाणी, महसूली, फौजदारी व इतर तंटे तसेच फौजदारी दखलपात्र आणि अदखलपात्र असे करावे.

**तंटे/गुन्हे यांची वर्गीकरणनुसार नोंदी करणे.**

वर्गीकरण केल्यानंतर मिटविता येण्यासारखे तंटे/गुन्हे यांची नोंद नोंदवही–२(अ) मध्ये करावी. मिटविता न येणाऱ्या तंटे/गुन्ह्यांची नोंद नोंदवही–२(ब) मध्ये करावी.

**तंटे मिटविणे.**

नोंदवही–२(अ) मधील मिटविता येण्यासारखे तंटे/गुन्हे समितीने मिटविण्याचा प्रयत्न करावा.

**तंटे मिटविण्याची कार्यपद्धती**

१ समितीने उभय पक्षकारांना बोलावून आणि त्यांची बाजू ऐकून घेऊन तंटे मिटविण्याचा प्रयत्न करावा. आवश्यक तेथे महसूल किंवा अन्य विभागाच्या कर्मचारी/अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व मदत घेण्यात यावी. त्याचबरोबर फौजदारी तंट्यांच्याबाबतीत आवश्यकतेनुसार पोलीस ठाणे प्रमुख व बीट अंमलदार यांचे मार्गदर्शन व साहाय्य घेऊन तंटे मिटविण्याचे प्रयत्न करावेत.

२ तंटे मिटविण्यासाठी महाराष्ट्र विधी सेवा आयोग, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व तालुका विधी सेवा प्राधिकरण यांचे साहाय्य घेण्यात यावे.

३ तंटामुक्त गाव समितीने आवश्यक तेथे मोफत कायदे सल्लागार समितीचा अथवा तज्ज्ञ वकिलांचा सल्ला घ्यावा. तसेच पक्षकारांना त्यांच्या तंट्यांतील कायद्याच्या बाजू स्पष्ट करून सांगण्यासाठीही आवश्यकतेनुसार त्यांची मदत घ्यावी.

४ एकमेकामध्ये तेढ वाढू न देता तंटे मिटविण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

५ तंटा/वाद मिटल्यानंतर संबंधित पक्षकारांमध्ये लेखी तडजोडनामा तयार करून तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष आणि निमंत्रक यांच्यासमक्ष पक्षकारांच्या त्यावर स्वाक्षरी घेण्यात याव्यात. तसेच अध्यक्ष व निमंत्रक यांनीही तडजोडनाम्यावर 'समोर' म्हणून स्वाक्षरी करावी.

६ दिवाणी, महसुली व इतर न्यायालयात प्रलंबित दाव्यासंबंधी तडजोड झाल्यानंतर उभय पक्षकारांच्या स्वाक्षरीने न्यायालयामध्ये वा सक्षम प्राधिकाऱ्याकडे पक्षकारांनी स्वतः अथवा त्यांच्या वकीलांमार्फत तडजोडनामा दाखल करून त्यावर न्यायालयाचे वा सक्षम प्राधिकाऱ्याचे आदेश प्राप्त करून घ्यावेत.

**अदखलपात्र व दखलपात्र फौजदारी तंटे/गुन्हे मिटविण्यासंबंधी खालील ३ प्रकारे कार्यपद्धती अवलंबण्यात यावी**

१ अदखलपात्र तंट्यांच्याबाबतीत उभय पक्षकारांच्यामध्ये तंटा मिटल्याचा लेखी तडजोडनामा करून त्यावर समितीचे अध्यक्ष व निमंत्रक यांच्यासमोर पक्षकारांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात याव्यात. त्याचप्रमाणे अध्यक्ष व निमंत्रक यांनीही तडजोडनाम्यावर 'समोर' म्हणून स्वाक्षरी करावी.

२ दखलपात्र गुन्ह्यांच्या बाबतीत पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल झालेली आहे परंतु न्यायालयात दोषारोपपत्र पाठविलेले नाही अशा तंट्यांमध्ये उभय पक्षकारांनी तडजोडनामा तयार करावा. तडजोडनाम्याची एक प्रत जोडून पोलीस ठाण्याकडे लेखी अर्ज करून फिर्याद मागे घेत असल्याचे कळवावे.

३ दखलपात्र गुन्ह्यांसंबंधी न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल झालेल्या तंट्यांच्या बाबतीत फिर्यादी व आरोपी यांनी न्यायालयासमोर वाद मिटल्याची लेखी पुरसीस (अर्ज) दाखल करावी. न्यायालयाने फौजदारी तंटा मिटल्यासंबंधी दिलेल्या आदेशाची सत्य प्रत प्राप्त करून समितीने दप्तरी ठेऊन घ्यावी व तंटा मिटल्याची नोंद संबंधित नोंदवहीत करावी.

**मिटलेल्या सर्व तंट्यांची नोंद नोंदवही–२(अ) मध्ये घेण्यात यावी.**

**ब) नव्याने निर्माण झालेले तंटे मिटविणे :** — एकूण गुण २०

प्रतिबंधात्मक उपाय योजना केल्यानंतरही काही तंटे निर्माण होण्याची शक्यता असल्याने ३० सप्टेंबरनंतर मोहीम कालावधीत नव्याने निर्माण झालेल्या तंट्यांची माहिती संकलन, वर्गीकरण, नोंद आणि तडजोड वर नमुद केलेल्या कार्यपद्धतीनुसार करावी. अशा मिटलेल्या तंट्यांची नोंद नोंदवही–३(अ) मध्ये करावी.

| तंट्यांचा प्रकार | दाखल तंटे सोडविण्यासाठी गुण | नवीन तंटे सोडविण्यासाठी गुण |
|---|---|---|
| दिवाणी | २५ | ०५ |
| महसुली | ३५ | ०५ |
| फौजदारी | ३५ | ०८ |
| इतर तंटे | ०५ | ०२ |
| एकूण | १०० | २० |

**परस्पर पोलीस ठाण्याकडे प्राप्त होणाऱ्या अर्जावरील कार्यवाही :**

मोहिमेच्या कालावधीमध्ये जर काही लोकांचे अर्ज परस्पर पोलीस ठाण्याकडे प्राप्त झाले तर पोलीस ठाणे प्रमुखाने सध्याच्या प्रचलित पद्धतीनुसार त्याची दखल घेऊन चौकशी व कारवाई करावी. मात्र असा अर्ज प्राप्त होताच त्यामधील मिटविता येणाऱ्या तंटे/गुन्ह्यांसंबंधीच्या अर्जाची एक प्रत तंटामुक्त गाव समितीस पाठवावी. समितीने अशा प्राप्त अर्जांची दखल घेऊन तक्रार मिटविण्याचा समांतर प्रयत्न करावा. तंटा मिटल्यास समितीने त्याची नोंद नोंदवही–३(अ) मध्ये करावी आणि पोलीस स्टेशन स्तरावर तडजोडनाम्याच्या आधारावर प्रकरण निकाली काढावे.

**२) प्रतिबंधात्मक उपाययोजना :** — एकूण गुण ८०

**१ सार्वजनिक सण/उत्सव रचनात्मक पद्धतीने व शांततेने साजरे करणे :** — गुण १०

- जयंती , उत्सव, गणेशोत्सव, इत्यादी समारंभ.
- सार्वजनिक उत्सव साजरे करण्याऱ्या मंडळांचे कार्यक्रम
- उत्सवांमधून समाजोपयोगी उपक्रम राबविणे.
- व्याखानमाला, प्रशिक्षण शिबीर इत्यादी आयोजित करणे.
- ''एक गाव एक गणपती'' यासारखे उपक्रम राबविणे.
- उत्सव/सण/यात्रा पोलीस बंदोबस्ताशिवाय शांततेत पार पाडणे.

**२ जातीय व धार्मिक सलोखा निर्माण करणे :** — गुण १०

- जातीय व धार्मिक सलोखा निर्माण करणारे उत्सव/सण एकत्रित येऊन साजरे करणे.
- आंतरजातीय/धर्मीय विवाहांना प्रोत्साहन देणे.
- मागासवर्गीय व अल्पसंख्याक यांच्या तक्रारी मिटविणे.
- जातीय व धार्मिक सलोख्याचे कार्यक्रम घेणे.
- पुतळे व प्रार्थना स्थळे यांच्या देखभाल व संरक्षणासाठी उपाययोजना करणे.

**३ सार्वजनिक व खाजगी मालमत्तांचे संरक्षण करणे व विद्रुपीकरण रोखणे :** — गुण १०

- निवडणूक, वाढदिवस व इतर कार्यक्रम यांच्या जाहिरातीचे फलक लावण्यासाठी नियमावली करणे व त्यांची सामंजस्याने अंमलबजावणी करणे.
- शासकीय/सार्वजनिक मिळकतीवर अतिक्रमणे होऊ न देणे.
- विद्रुप झालेल्या मालमत्ता पूर्ववत करणे.

**४ ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यरत करणे :** — गुण १०

- ग्राम सुरक्षा दल स्थापन करणे.
- सदस्यांना गणवेश व प्रशिक्षण देणे.
- ग्राम सुरक्षा दलाची रात्रगस्त चालू करणे.

**५ अवैध धंद्यांना प्रतिबंध करणे व त्यांचे निर्मूलन करणे :** — गुण १५

- गावातील अवैध धंदे रोखण्यासाठी प्रयत्न करणे.
- अवैध धंदे करणाऱ्या लोकांना पर्यायी रोजगाराकडे वळविण्यासाठी प्रयत्न करणे.
- व्यसनमुक्तीसाठी कार्यक्रम राबविणे, व्यसनी लोकांचे समुपदेशन करणे.
- आवश्यकतेनुसार अवैध धंदे निर्मूलन/प्रतिबंध यासाठी पोलीसांची मदत घेणे/पोलीसांना सहकार्य करणे.

**६ सामाजिक सुरक्षिततेसाठी कार्यक्रम राबविणे.** — गुण ५

- हुंडाबळी रोखणे.
- महिलांचे सामाजिक प्रश्न व कौटुंबिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे.
- जेष्ठ नागरिकांचे प्रश्न सोडवणुकीसाठी प्रयत्न करणे.
- महिला बचतगट निर्मिती/सक्षमीकरणाचे प्रयत्न करणे.
- सामूहिक विवाह सोहळे आयोजित करणे.
- गावामध्ये बालविवाह होणार नाहीत यासाठी प्रयत्न करणे.





महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम